# मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

## ''सफाई कामगार'' पदाकरिता निवड प्रक्रिया

### नोटीस

**क्र. प्रशासन/५१/२०२५,**

**दिनांक : ०७/०१/२०२५**

मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या आस्थापनेवरील सफाई कामगार पदाकरिता प्रकाशित केलेली जाहिरात दिनांक १९/०३/२०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०४ जानेवारी, २०२५ रोजी प्रात्यक्षिक परिक्षा आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने निम्नलिखित याद्या प्रकाशित करण्यात येत आहेत.

१. सफाई कामगार पदाकरिता घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेत उमेदवारांना मिळालेले गुण दर्शवणारी यादी.

२. शारिरीक कार्यक्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या २७ उमेदवारांची यादी.

शारिरीक कार्यक्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी शुक्रवार दि.२४/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, सिडको एन–३, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे. निवड समितीने निश्चित केलेल्या मानांकनाप्रमाणे सफाई कामगार पदाशी सुसंगत असे शारिरीक कार्यक्षमता चाचणीचे स्वरूप असेल.

ओळखीच्या पुराव्यासाठी उमेदवाराने स्वत:चे आधारकार्ड किंवा निवडणूक आयोगाचे ओळखपत्र किंवा पॅनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना किंवा पासपोर्ट पैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

तसेच नाव बदललेले असल्यास उमेदवाराने राजपत्र/विवाह नोंदणी पत्र किंवा त्यासंबंधीचे कागदपत्र आणणे अनिवार्य आहे.

**याशिवाय, उमेदवारांनी शारिरीक कार्यक्षमता चाचणीसाठी येताना प्रात्यक्षिक परीक्षेच्यावेळी जे प्रवेशपत्र देण्यात आलेले होते ते सोबत आणणे अनिवार्य आहे.**

स्वाक्षरीत /–

**(विमलनाथ एस. तिवारी)**
**प्रबंधक (प्रशासन)**